सांजदैनिक
वऱ्हाडी आवाज



# जनधन खातेदारांनी केवायसी करून घ्यावी – रिझर्व बँक निरीक्षक सचिन शेंडे यांचे आवाहन





शेगाव : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून २०१४-१५ साली सुरू झालेल्या जनधन योजनेमुळे देशभरातील कोट्यवधी सामान्य नागरिकांना प्रथमच बँकिंग व्यवस्थेशी जोडले गेले. या योजनेत उघडलेल्या जनधन खात्यांना आता दहा वर्षे पूर्ण होत असल्याने रिझर्व्ह बँकेच्या नियमाप्रमाणे सर्व खातेदारांनी आपली केवायसी (Know Your Customer) प्रक्रिया पूर्ण करणे बंधनकारक आहे.

या पार्श्वभूमीवर रिझर्व्ह बँक निरीक्षक सचिन शेंडे यांनी आवाहन करताना सांगितले की, "जनधन खात्यातील सर्व ग्राहकांनी केवायसी करून घेणे अनिवार्य असल्यामुळे तातडीने बँकांशी संपर्क साधावा. आपले खाते सुरक्षित, सुरळीत आणि आर्थिक व्यवहारासाठी सक्षम ठेवण्यासाठी केवायसी करणे अत्यावश्यक आहे."

शेगाव येथे जनजागृती कार्यक्रम

दिनांक ८ सप्टेंबर रोजी केसरबाई देशमुख सभागृह, गांधी चौक, शेगाव येथे भारतीय स्टेट बँकेच्या पुढाकाराने जनधन खातेदारांसाठी आर्थिक साक्षरता, केवायसी व खात्यांची सुरक्षितता या विषयावर जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून सचिन शेंडे (निरीक्षक, रिझर्व बँक), किस्ले कुमार (सहाय्यक महाप्रबंधक, एसबीआय), पंकज कुमार (क्षेत्रीय प्रबंधक, सेंट्रल बँक), डॉ. अशोक खरात (सीईओ, बुलढाणा डिस्ट्रिक्ट को-ऑपरेटिव्ह बँक), के. के. सिंग (एल.डी.एम.) यांच्यासह विविध बँकांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

केवायसी सेवा सर्वत्र उपलब्ध

ग्राहकांच्या सोयीसाठी शासकीय बँका, ग्राहक सेवा केंद्रे, एटीएम, मोबाईल बँकिंग तसेच ग्रामपंचायत स्तरावर केवायसी सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. यामुळे कोणताही ग्राहक वंचित राहणार नाही, अशी ग्वाही रिझर्व्ह बँककडून देण्यात आली.

स्टेट बँक व्यवस्थापक गौरव जामदार यांचे आवाहन

भारतीय स्टेट बँक गांधी चौक शेगाव शाखेचे व्यवस्थापक गौरव जामदार यांनी सांगितले की, "सर्व जनधन खातेदारांनी ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत आपली केवायसी पूर्ण करून घ्यावी. खातेदार बँकेशी थेट संपर्क साधू शकतात किंवा सेवा केंद्रांच्या सुविधांचा वापर करू शकतात."

जनधन खात्यासोबत विमा संरक्षण

जनधन खातेदारांना बँकिंग सोयींबरोबरच वार्षिक केवळ २० रुपयांच्या प्रीमियमवर अपघाती विमा संरक्षण मिळते. या योजनेचा प्रत्यक्ष लाभ शेगावातील विजय ओंकार सैरसे यांना मिळाला. त्यांचे वारसांना अपघाती मृत्यूमुळे २ लाख रुपयांची भरपाई देण्यात आली. या उदाहरणातून जनधन खात्याबरोबर उपलब्ध विमा योजनांचा लाभ घेण्याचे आवाहनही करण्यात आले.

कार्यक्रमाचे संचालन

कार्यक्रमाचे प्रास्ताविक किस्ले कुमार यांनी केले. संचालन गौरव जामदार यांनी तर आभार प्रदर्शन रोहित गाडे यांनी केले. शेगाव शहरातील सर्व राष्ट्रीयकृत बँकांचे अधिकारी-कर्मचारी, सहकारी बँकांचे प्रतिनिधी, महिला बचत गट व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

निष्कर्ष :

जनधन खातेदारांनी वेळ न घालवता आपल्या जवळच्या बँकेत संपर्क करून ३० सप्टेंबर २०२५ पूर्वी केवायसी प्रक्रिया पूर्ण करावी. त्यामुळे आपले खाते केवळ सुरक्षितच होणार नाही तर विमा व इतर शासकीय योजनांचा लाभ घेणेही सोपे होणार आहे.